**महाराष्ट्र शासन**
**पोलीस अधीक्षक कार्यालय सोलापूर ग्रामीण**
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर
दुरध्वनी क्रमांक:- ०२१७-२७३२००१.
EmailID sp.solapur.r@mahapolice.gov.in

क्रमांक:-आस्था-१/पो.भरती/२०२१/नि.आदेश/EB/२०२३-4526 सोलापूर ग्रा. दिनांक २४/०५/२०२३

**संदर्भ** :- १) मा.पोलीस महासंचालक,प्रशिक्षण व खास पथके,म.रा.मुंबई यांचेकडील पत्र क्र.प्रशि/पो.शि.भरती/प्रक्रिया२०२१/१८८/२०२१/२३८२, दि.०४/११/२०२२.
२) या कार्यालयाकडून दि.०६/११/२०२२ रोजी दैनिक लोकमत, दैनिक संचार व साप्ताहिक शौर्य या वृत्तपत्रात दिलेली जाहिरात.
३) मा.पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, म.रा.मुंबई यांचेकडील पत्र क्र.प्रशि./पो.शि.भरती/रिक्त पदे माहिती/१३२/२०२०-३६९०,दि.०६/१२/२०२२

**विषय** :- **पोलीस भरती चालक -२०२१**
**पोलीस शिपाई चालक या पदावर नियुक्ती बाबत.**

---ooo---

**आदेश :-**

महाराष्ट्र शासन गृह विभाग यांचेकडील क्र.एमटीएस ०३१९/प्र.क्र.२४५/पोल-४ दिनांक ०६ सप्टेंबर २०१९ अन्वये, महाराष्ट्र चालक पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम २०१९ व संदर्भाधिन पत्रात नमूदप्रमाणे दिनांक ०२/०१/२०२३ रोजी पासून पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण आस्थापनेवर पोलीस शिपाई चालक पदाची सरळसेवा भरती आयोजित करण्यात आली होती. खालील उमेदवारांना जिल्हा शल्यचिकीत्सक, श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर यांनी **पोलीस शिपाई चालक** या पदावरील नियुक्तीसाठी वैद्यकिय दृष्टया पात्र असल्याचे घोषित केल्यामुळे व खालील नमूद उमेदवार हे राहत असलेल्या घटकाकडून चारित्र्य पडताळणी प्राप्त झाले असुन त्यामध्ये कोणत्याही प्रकारचे आक्षेपार्ह नोंदी आढळून येत नसलेबाबत कळविल्याने व चालक पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम २०१९ मधील तरतुदींनुसार त्यांना **पोलीस शिपाई चालक** या अस्थायी पदावर तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात येत आहे. त्यांना सातवा वेतन आयोग, वेतन स्तर S-७, रु. २१७०० - ६९१००/- व देय असणारे इतर भत्ते यामध्ये कर्तव्यास रुजु झाले दिनांकापासून अनुज्ञेय होतील. खालील उमेदवारांनी राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय, सोलापूर ग्रामीण यांचेकडे त्वरित रुजु व्हावे.

| अ. क्रं. | चेस्ट क्रमांक | उमेदवाराचे नांव व पत्ता | जन्म दिनांक | जात | निवड प्रवर्ग | सुरवातीचे वेतन |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | ६४९ | श्री. कुशाल किशोर कांडेकर रा.पेकळवाडी पो.टाकळी ता.गंगापूर जि.संभाजीनगर | १८/१२/२००० | मराठा | खुला (सर्वसाधारण) | रु. २१७००/- विशेष वेतन ७५०/- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | १००५ | श्री. प्रविण अंकुश साखरे रा.फ्लॅट न.७०३ ब्रोकफिल्ड विलोज धर्मावत पुलजवळ कात्रज बायपास पिसोळी ता.हवेली जि.पुणे | २२/०२/१९८६ | मराठा | खुला ( माजी सैनिक समांतर आरक्षण) | रु. २१७००/- विशेष वेतन ७५०/- |
| ३ | ९१७ | श्रीमती शिवलिला बसण्णा धनगर रा.नागोर पो.मैंदर्गी ता.अक्कलकोट जि.सोलापूर | ०५/०६/१९९७ | धनगर | खुला (महिला समांतर आरक्षण) | रु. २१७००/- विशेष वेतन ७५०/- |
| ४ | ९२५ | श्रीमती .ऋतुजा सर्जेराव पाटील रा.जेएन२/ए-१/अवनी अर्पाटमेंट/ सेक्टर -९,वाशी वारणा डेअरी, ठाणे | ०१/१०/१९९८ | मराठा | खुला (महिला समांतर आरक्षण) | रु. २१७००/- विशेष वेतन ७५०/- |
| ५ | १०११ | श्री.अतुलकुमार गोविंदराव जाधव रा.११० स्वामीनारायण मंदिर,समुद्रल कालदेव,निबांला ता.उमरगा जि.उस्मानाबाद | १६/०९/१९८४ | मराठा | आ.दु.घटक (माजी सैनिक समांतर आरक्षण) | रु. २१७००/- विशेष वेतन ७५०/- |
| ६ | ९१४ | श्रीमती.प्रियंका पाडुंरग लंगोटे रा.बोरगांव खु.उपळे ता.बार्शी जि.सोलापूर | ३१/०८/१९९६ | मराठा | आ.दु.घटक (महिला समांतर आरक्षण) | रु. २१७००/- विशेष वेतन ७५०/- |
| ७ | ९२३ | श्रीमती.शारदा तेजराव हावळे रा.मु.पो.मौदा बु.ता.सिलोडं जि.संभाजीनगर | २२/०७/२००० | मराठा | आ.दु.घटक (महिला समांतर आरक्षण) | रु. २१७००/- विशेष वेतन ७५०/- |
| ८ | ७०४ | श्री. महेश चंद्रकांत गोडसे रा.गोडसेवाडी ता.सांगोला जि.सोलापूर | ०३/०१/२००० | माळी | इ.मा.व. (सर्वसाधारण) | रु. २१७००/- विशेष वेतन ७५०/- |
| ९ | ५४९ | श्री.रमेश जगन्नाथ म्हेत्रे रा.कुमठे ता.उत्तर सोलापूर जि.सोलापूर | १५/०४/१९९६ | माळी | इ.मा.व. (सर्वसाधारण) | रु. २१७००/- विशेष वेतन ७५०/- |
| १० | १८९ | श्री.धनजंय दत्तू बोराटे रा.फोंडशिरस ता.माळशिरस जि.सोलापूर | २५/०३/१९९३ | माळी | इ.मा.व. (सर्वसाधारण) | रु. २१७००/- विशेष वेतन ७५०/- |
| ११ | ९१२ | श्रीमती सोनाली गोविंद जुंदळे रा.गुंजेगाव ता.मंगळवेढा जि.सोलापूर | ०१/०२/२००२ | न्हावी | इ.मा.व (महिला समांतर आरक्षण) | रु. २१७००/- विशेष वेतन ७५०/- |
| १२ | १०१६ | श्री. जमालोदिदन मैनुदिदन फकीर रा.सैनिक नगर,अनगर ता.मोहोळ जि.सोलापूर | १०/०४/१९८५ | फकीर | इ.मा.व. (माजी सैनिक समांतर आरक्षण) | रु. २१७००/- विशेष वेतन ७५०/- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १३ | ४८६ | श्री.कृष्णा नारायण नागरगोजे रा.येवलवाडी ता.पाटोदा जि.बीड | १८/०८/१९९५ | वंजारी | भज-ड (सर्वसाधारण) | रु. २१७००/- विशेष वेतन ७५०/- |
| १४ | ४९६ | श्री.पांडुरंग तुकाराम टिंगरे रा.कौठाळी ता.पंढरपूर जि.सोलापूर | १०/०७/१९९७ | लोहार | भज-ब (सर्वसाधारण) | रु. २१७००/- विशेष वेतन ७५०/- |
| १५ | २२ | श्री.अंकुश हरिदास निबांळकर रा.इटोळी ता.जिंतूर जि.परभणी | २५/१०/२००० | अंध | एस.टी. (सर्वसाधारण) | रु. २१७००/- विशेष वेतन ७५०/- |
| १६ | ४३४ | श्री. किरण शेषराव दांडगे रा.अमसरी पो.शिवणा ता.सिलोड जि.संभाजीनगर | २०/०८/१९९५ | कोळी मल्हार | एस.टी. (सर्वसाधारण) | रु. २१७००/- विशेष वेतन ७५०/- |
| १७ | ९०८ | श्री. किरण छगन दरौ रा.विचारपूर पो.दरेकसा ता.सालेकसा जि.गोंदिया | ३०/१२/१९९५ | गोंड | एस.टी. (महिला समांतर आरक्षण) | रु. २१७००/- विशेष वेतन ७५०/- |

**२. वर नमुद उमेदवारांची तात्पुरती नियुक्ती ही खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून करण्यांत आली आहे**

- वर नमुद उमेदवारांच्या नियुक्त्या चारित्र्य व वर्तणुकीची पडताळणी, जातीचे दाखले, शैक्षणिक दाखले व भरुन दिलेल्या साक्षांकन नमुना पडताळणीच्या अधिन राहुन करण्यात आली आहे. सेवेत नियुक्त झाल्यानंतर पून्हा अशा कोणत्याही घटना निष्पन्न झाल्यास वा साक्षांकन नमुन्यामध्ये दिलेली माहिती ही खोटया स्वरुपाची, वा मुद्दाम म्हणून दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास व गुन्हयामध्ये शिक्षा वा दंड झाल्याचे निदर्शनास आल्यास तुम्हांस सेवेतून कमी करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

- महाराष्ट्र शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी-२०११ प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब, दिनांक १२ डिसेंबर २०११ अन्वये, नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर उमेदवाराने नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासुन सहा महिन्याच्या आत आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता संबंधित जात पडताळणी समितीकडून करुन घेणे आवश्यक राहिल. उमेदवाराने नियुक्ती स्विकारताच जात वैधता तपासणी करण्यासाठी प्रस्ताव संबंधित जात पडताळणी समितीकडे सादर करावा व जात पडताळणी समितीने दिलेल्या पोचपावतीची साक्षाकिंत प्रत या कार्यालयास सादर करावी. जातपडळणीमध्ये जातीचे प्रमाणपत्र हे अवैध ठरल्यास त्यांना सेवेतून कमी करण्यात येईल तसेच महाराष्ट्र अनुसुचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन ) अधिनियम, २००० यातील तरतुदीनुसार त्वरीत कारवाई करण्यांत येईल याची नोंद घ्यावी जात वैधता प्रमाणपत्र मिळण्या संबंधी योग्य तो पाठपुरावा करावा.

- तुम्हांस देण्यात आलेली नियुक्ती ही तात्पुरती व हंगामी स्वरुपाची असून तुम्हांस कोणत्याही प्रकारची नोटीस अथवा पुर्वसुचना न देता सेवेतून कमी करण्यात येईल.

- तुम्ही 'चालक पोलीस शिपाई' या पदाचे प्रशिक्षण कालावधीत अथवा प्रशिक्षण संपल्यानंतर पुढील तीन वर्षात राजीनामा दिल्यास व पदावरुन कार्यमुक्त करण्याची विनंती केल्यास प्रशिक्षणावरील झालेला खर्च व प्रशिक्षण कालावधीत अदा केलेल्या वेतन व भत्यासहित रक्कम आगावु शासनास जमा करावी लागेल, त्यानंतर आपणास सेवेत पुर्ननियुक्ती बाबतचा कोणताही हक्क रहाणार नाही अथवा त्याबाबतचा विचार केला जाणार नाही याची नोंद

घ्यावी. सक्षम प्राधिका-यासमोर आपण त्या बाबतचे रु. १००/- चे मुद्रांक वरचे हमीपत्र शासनास / या कार्यालयास लिहुन दिलेले आहे.

- वर नमुद उमेदवारांना नियुक्ती नंतर महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र. अंनियो-२०१२/प्र.क्र.९६/सेवा-४, दिनांक २७/०८/२०१४ मध्ये नमुद नुसार "राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना (NPS)" लागु होईल. तुम्हास सध्या अस्तित्वात असलेली निवृत्तीवेतन योजना म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम,१९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अशंराशीकरण) नियम,१९८४ आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागु होणार नाही.
- महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग,शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही-२०००/प्र.क्र.(१७/२०००)/बारा. दिनांक २८ मार्च, २००५ अन्वये ,लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन (लहान कुटूंब म्हणजे दोन मुले यांसह पत्नी व पती ) प्राप्त करुन घेण्यात आले आहे. त्यामुळे कुटुंब मर्यादा दोन अपत्याचेवर सेवा कालावधीमध्ये वाढणार नाही याची दक्षता घ्यावी. कुटुंब मर्यादेत वाढ झाल्यास कोणत्याही प्रकारच्या शासकीय सवलतीस पात्र रहाणार नाही व ती शासकीय सेवेसाठी अनर्हता टरेल.
- पोलीस प्रशिक्षण विदयालयात घेतली जाणारी परिक्षा तुम्ही चार संधीमध्ये उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.तुम्ही चार संधीमध्ये परिक्षा उत्तीर्ण न झाल्यास त्वरीत प्रभावाने तुमची सेवा समाप्त करण्यात येईल याची नोंद घ्यावी. सदरच्या प्रशिक्षण कालावधीत अनाधिकृतपणे गैरहजर राहणे, अंतिम परिक्षेत असभ्य वर्तन, गैरशिस्त किंवा कॉपी करणे वगैरे कृत्य केल्याचे निदर्शनास आल्यास अथवा तसे सिध्द झाल्यास आपली सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल याची नोंद घ्यावी.
- प्रशिक्षण केंद्र येथील मुलभूत प्रशिक्षण पुर्ण झाल्यानंतर तुम्हांस सोलापूर ग्रामीण पोलीस दलाच्या आस्थापनेवरील मोटार परिवहन विभाग येथे कर्तव्यास नियुक्त करण्यात येईल, याची नोंद घ्यावी. पोलीस अंमलदार या नात्याने पोलीस दलामध्ये नियुक्त झाल्यानंतर तुम्हांवर सोपवलेली सर्व प्रकारची कर्तव्य बजाविणे तुमचेवर बंधनकारक राहिल.
- महाराष्ट्र सहायक पोलीस उपनिरीक्षक चालक, पोलीस हवालदार चालक, पोलीस नाईक चालक व पोलीस शिपाई चालक (सेवाप्रवेश) नियम, २०१९ मधील नियम ६ चा उपखंड (१) (क) नुसार उमेदवाराने पोलीस शिपाई चालक नियुक्त झालेनंतर अनुज्ञप्ती अदा करण्याकरिता प्राधिकृत केलेले सक्षम प्राधिकारी यांनी अदा केलेला हलके वाहन (LMV-TR) चालविण्याचा वैध परवाना धारण करणे आवश्यक राहील.
- सदर भरती प्रक्रियेमध्ये निवड होऊन पोलीस शिपाई चालक पदावर नियुक्ती झालेल्या उमेदवारांनी महाराष्ट्र सहायक पोलीस उपनिरीक्षक चालक, पोलीस हवालदार चालक, पोलीस नाईक चालक व पोलीस शिपाई चालक (सेवाप्रवेश) नियम, २०१९ मधील नियम ६ चा उपखंड (१)(क)(२) नुसार जड वाहन (HGV) आणि जड वाहन प्रवासी (HPMV) चालविण्याचा परवाना नियुक्ती आदेशाच्या दिनांपासून पुढील ५ वर्षात प्राप्त करणे बंधनकारक राहील.अन्यथा पुढील वेतनवाढी व पदोन्नतीकरीता पात्र राहणार नाही.
- सदर भरती प्रक्रियेमध्ये निवड होऊन पोलीस शिपाई चालक पदावर नियुक्ती झालेले उमेदवार महाराष्ट्र सहायक पोलीस उपनिरीक्षक चालक, पोलीस हवालदार चालक, पोलीस नाईक चालक व पोलीस शिपाई चालक (सेवाप्रवेश) नियम, २०१९ मधील नियम १६ (१) नुसार कार्यकारी पोलीस दलात बदलीसाठी पात्र असणार नाही. मात्र ते त्यांच्या विनंतीनुसार जिल्हयाचे बाहेर फक्त इतर पोलीस घटकात त्याच पदावर बदलीस पात्र राहातील.

३. पोलीस दलाच्या सेवेच्या अनुषंगाने योग्यता व पात्रता तपासण्यासाठी पोलीस प्रशिक्षण विद्यालयामध्ये मानसिक चाचणी (Psychological Test) घेण्यात येईल. सदर चाचणीत तुम्ही अपात्र टरल्यास तुमची सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल याची नोंद घ्यावी. चालक पोलीस शिपाई या पदावर नियुक्ती केलेल्या उमेदवारांना मुंबई पोलीस अधिनियम १९५१, मुंबई पोलीस ( शिस्त व अपिल) नियम १९५६ व राज्य शासनाने वेळोवेळी विहीत केलेले व करण्यात येणारे अन्य सर्व नियम लागू होतील.

४. वरील नमुद उमेदवारांनी पोलीस मुख्यालय, सोलापूर ग्रामीण येथे राखीव पोलीस निरिक्षक यांचेकडे त्वरित रुजु व्हावे. प्रशिक्षणास येताना आवश्यक ते सिव्हील ड्रेस, पेटी, कुलूप, बादली, ताट, वाटी, तांब्या व विजेरी इ. साहित्य बरोबर आणावे. तसेच भोजन अग्रीम रु. ३०००/- सोबत आणावा. प्रशिक्षणाच्या कालावधीत कोणत्याही प्रकारची रजा मिळणार नाही. पोलीस मुख्यालयाचा परिसर सोडून बाहेर जाता येणार नाही त्याच प्रमाणे कोणताही प्रशिक्षणार्थी उमेदवार स्वत:जवळ भ्रमण ध्वनी, रेडीओ, टेप रेकॉर्ड बाळगणार नाही तसेच प्रशिक्षण कालावधीत प्रशिक्षण केंद्रावर सोबत ठेवणार नाही.

५. उमेदवारांनी प्रशिक्षण कालावधीत त्यांची शिस्त ही अत्यंत उच्च दर्जाची राहील याची दक्षता घ्यावी. वरिष्ठांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशाचे पालन कसोशीने होईल याची दक्षता बाळगावी. सदर प्रशिक्षण कालावधीत गैरशिस्तीचे वर्तन व असभ्य वागणुक आढळून आल्यास त्वरीत सेवेतून कमी करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

( शिरीष सरदेशपांडे )
**पोलीस अधिक्षक सोलापूर ग्रामीण.**

**प्रति,**

वरील सर्व संबधित उमेदवार.

**प्रत :-** राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय सोलापूर ग्रामीण.

२. सदर आदेशाची मुळप्रत नमुद उमेदवारास बजावून त्याची दुय्यम प्रतीवर स्वाक्षरी घ्यावी व दुय्यम प्रत या कार्यालयास त्वरीत सादर करावी.

**प्रत :-** राखीव पोलीस निरिक्षक, पोलीस मुख्यालय,सोलापूर ग्रामीण. (दोन प्रतिमध्ये)

२. वरिल उमेदवार हे कर्तव्यावर हजर झाल्याबाबतचा अहवाल दिनांकासह या कार्यालयास सादर करावा. सदरील उमेदवारांना योग्य तो सरकारी सरंजाम व साहित्य आदा करण्यात यावा. तसेच प्रत्येक उमेदवाराकडुन भोजन अग्रीम म्हणुन रु. ३०००/- घेण्यात यावे.

**प्रत** :- प्रभारी अधिकारी मोटार परिवहन विभाग सोलापूर ग्रामीण

**प्रत:-** प्रमुख लिपीक लेखा शाखा (चार प्रतिसह) / जि. पो. पत्रक / आदेश फाईल / पशा -३.